# ११ वातानुकूलित लोकल फेऱ्या रद्द

## तांत्रिक बिघाडामुळे पश्चिम रेल्वे प्रवाशांचे हाल

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** पश्चिम रेल्वेवरील दोन वातानुकूलित लोकलमध्ये शुक्रवारी तांत्रिक बिघाड झाला. या घटनेमुळे प्रवाशांचे प्रचंड हाल झाले. रेल्वे प्रवासादरम्यान उन्हाच्या झळा बसू नये म्हणून प्रवाशांनी गारेगार प्रवासासाठी अधिकचे पैसे मोजून वातानुकूलित लोकलचे तिकीट काढले. मात्र, अचानकपणे वातानुकूलित लोकलमध्ये बिघाड झाल्याने उन्हाच्या काहिलीने हैराण होण्याची वेळ प्रवाशांवर ओढवली.

वातानुकूलित लोकलमध्ये बिघाड झाल्याने तब्बल ११ वातानुकूलित लोकल फेऱ्या रद्द करण्यात आल्या. तर, दुसऱ्या लोकलमधील वातानुकूलित यंत्रणा बंद पडल्याने तिचे दरवाजे उघडे ठेवून चालवण्याची नामुष्की पश्चिम रेल्वे प्रशासनावर ओढवली. तसेच, या लोकलची आपत्कालीन साखळी खेचल्यामुळे पश्चिम रेल्वेचे वेळापत्रक बिघडले.

मध्य रेल्वेवरील कळवा-मुंब्रादरम्यान गुरुवारी वातानुकूलित लोकल अचानक थांबली. या लोकलचे दरवाजे उघडत नव्हते. तसेच शुक्रवारी सकाळी ७.१५ च्या विरार - चर्चगेट लोकलमध्ये तांत्रिक बिघाड झाला. त्यामुळे सकाळपासून पश्चिम रेल्वेवरील विरार - चर्चगेटदरम्यान धावणाऱ्या वातानुकूलित लोकल रद्द करण्यात आल्या. वातानुकूलित लोकलऐवजी साध्या लोकल चालवण्यात आल्या. त्यामुळे वातानुकूलित लोकलच्या पासधारक आणि तिकीटधारक प्रवाशांना साध्या लोकलमधून प्रवास करावा लागला.



### प्रवाशांचा श्वास कोंडला...

शुक्रवारी सकाळी ८.३५ च्या विरार – चर्चगेट वातानुकूलित लोकलमधील वातानुकूलित यंत्रणा बंद पडली. त्यामुळे लोकलमध्ये प्रवाशांचा श्वास कोंडू लागला. या बिघाडामुळे प्रवाशांमध्ये गोंधळ उडाला. त्यामुळे प्रवाशांनी आपत्कालीन साखळी खेचून लोकल थांबवण्याचा प्रयत्न केला. परिणामी, इतर लोकलचे वेळापत्रक कोलमडले. अखेरीस काही प्रवाशांनी सकाळी ९.२ वाजता मीरा रोड स्थानकांदरम्यान आपत्कालीन साखळी खेचून लोकल थांबवली. त्यानंतर, रेल्वे कर्मचारी घटनास्थळी पोहोचले आणि वातानुकूलित यंत्रणा सुरू करण्यासाठी लोकलमध्ये दाखल झाले. मात्र, डब्यात गर्दी असल्याने ही यंत्रणा सुरू करण्यात अपयश येत होते. त्यामुळे दरवाजे उघडे ठेवून लोकल चर्चगेट दिशेने धावली.

“ तिकीट काढून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना उत्तम सेवा देण्याची जबाबदारी पश्चिम रेल्वे प्रशासनाची आहे. मात्र, प्रशासन त्यात अपयशी ठरत आहे. त्यामुळे प्रवाशांना झालेल्या त्रासाबद्दल नुकसानभरपाई द्यावी. तसेच, एका दिवसाचे तिकिटाचे पैसे परत करावे. निष्काळजीपणाने काम करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुद्ध कडक कारवाई करावी. - **सुभाष गुप्ता**, अध्यक्ष, रेल यात्री परिषद

“ पश्चिम रेल्वेच्या एका वातानुकूलित लोकलमध्ये गुरुवारी रात्री बिघाड झाल्याचे तपासणीत समोर आले. त्यामुळे सात फेऱ्या रद्द करण्यात आल्या. या लोकलच्या जागी साध्या लोकल चालवण्यात आल्या. तर, दुसऱ्या वातानुकूलित गाडीमधील वातानुकूलित यंत्रणेत बिघाड झाला होता. या बिघाडामुळे एकही लोकल रद्द करण्यात आली नसून वातानुकूलित लोकलऐवजी साध्या लोकल चालविण्यात आल्या. तसेच, पश्चिम रेल्वेचे वेळापत्रक बिघडले नाही. तिकिटाच्या नुकसानभरपाईबाबत अद्याप ठोस सांगता येणार नाही. - **सुमित ठाकूर**, मुख्य जनसंपर्क अधिकारी, पश्चिम रेल्वे

# ‘ट्रामाडॉल’ तस्करीप्रकरणी कंपनीच्या संचालकाला अटक

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

**मुंबई :** मुंबई सीमाशुल्क विभागाने प्रतिबंधित ‘ट्रामाडॉल’च्या सुमारे साडेदहा लाख गोळ्यांच्या तस्करीप्रकरणी गुरुवारी हैदराबाद येथून एका कंपनीच्या संचालकाला अटक केली. मुंबईत २८ फेब्रुवारी रोजी २१ कोटी रुपये किमतीच्या या गोळ्या जप्त करण्यात आल्या होत्या. आरोपीच्या कंपनीने त्यांची निर्मिती केल्याचा आरोप आहे. ‘टॅमोल-एक्स-२२५’ या कॅल्शियम कार्बोनेट गोळ्या असल्याचे जाहीर करून त्याची सुदानमध्ये तस्करी करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता.

सीमाशुल्क विभागाने गेल्या फेब्रुवारी महिन्यात निर्यात करण्यापूर्वीच संशयित गोळ्या ताब्यात घेतल्या होत्या. सहारच्या एअर कार्गो कॉम्प्लेक्स परिसरातून त्या जप्त करण्यात आल्या होत्या. तपासणीत दक्षिण सुदान येथील जुबा येथे मेसर्स फर्स्ट वेल्थ सोल्युशन्समार्फत त्या पाठवण्यात येत होत्या.

कागदपत्रानुसार टॅमोल-एक्स-२२५ च्या साडेदहा लाख गोळ्यांची २१ पाकिटे असल्याचे जाहीर करण्यात आले होते. तपासणीत चुकीच्या माहितीच्या आधारे गोळ्या पाठवण्यात येत असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर सीमाशुल्क विभागाने २८ फेब्रुवारीला त्या जप्त केल्या. त्यानंतर त्या तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवण्यात आल्या होत्या. या गोळ्या ट्रामाडॉलच्या असल्याचे चाचणीच्या स्पष्ट झाले.

आंध्र प्रदेशातील एका औषध कंपनीने या गोळ्यांची निर्मिती केल्याचे तपासात निष्पन्न झाले. या कंपनीच्या सर्व औषध निर्मिती व परवान्यांची जबाबदारी असलेला संचालक श्रीधर रेड्डी (४६) याला गुरुवारी सीमाशुल्क विभागाने अटक केली.

‘ट्रामाडॉल’ हे एक वेदनाशामक औषध आहे. त्याचा व्यसनासाठी वापर होत असल्यामुळे एप्रिल २०१८ मध्ये भारतात त्यावर बंदी घालण्यात आली होती.

Reliance
Industries Limited
Growth is Life

नोंदणीकृत कार्यालय: ३रा मजला, मेकर चेंबर्स ४, २२२, नरिमन पॉइंट, मुंबई – ४०० ०२१.
दूरध्वनी: ०२२-३५५५ ५००० • फॅक्स: ०२२-२२०४ २२६८
ई-मेल: investor.relations@ril.com
CIN: L17110MH1973PLC019786

**३१ मार्च, २०२३ रोजी संपलेल्या वर्षाचा लेखापरीक्षित एकत्रित वित्तीय परिणामांचा संक्षिप्त गोषवारा**

(₹ कोटीत, प्रति समभाग आकडेवारी व्यतिरिक्त)

| तपशील | संपलेले वर्ष 31 मार्च, २०२३ | संपलेले वर्ष ३१ मार्च, २०२२ |
|---|---|---|
| विक्री व सेवा मूल्य (महसूल) | ९७६,५२४ | ७९२,७५६ |
| वजा: वसूल केलेला जीएसटी | ८३,५८० | ७१,१२२ |
| **प्रचलनाद्वारे महसूल** | **८९२,९४४** | **७२१,६३४** |
| असाधारण मुद्दे आणि करपूर्व नफा | ९४,८०१ | ८१,३०६ |
| करपूर्व नफा | ९४,८०१ | ८४,१४२ |
| वर्षासाठी नफा* | ७४,०८८ | ६७,८४५ |
| एकूण सर्वसमावेशक मिळकत (कर पश्चात)* | ५५,२७६ | ९०,१०५ |
| भरणा केलेले इक्विटी समभाग भांडवल, इक्विटी समभाग प्रत्येकी ₹१०/- दर्शनी मूल्याचा | ६,७६६ | ६,७६५ |
| पुनर्मूल्यांकित राखीव निधी वगळता इतर इक्विटी | ८१४,३८७ | ७७२,७२० |
| प्रति इक्विटी समभाग मिळकत (दर्शनी मूल्य ₹१०/- प्रत्येकी) | | |
| मूळ (₹ मध्ये) असाधारण मुद्दे पश्चात | ९८.५९ | ९२.०० |
| मूळ (₹ मध्ये) असाधारण मुद्दे पूर्व | ९८.५९ | ८७.७१ |
| सौम्य (₹ मध्ये) असाधारण मुद्दे पश्चात | ९८.५९ | ९०.८५ |
| सौम्य (₹ मध्ये) असाधारण मुद्दे पूर्व | ९८.५९ | ८६.६१ |

*नियंत्रण विरहित स्वारस्य समभाग समाविष्ट

टिपा:
१. २१ एप्रिल, २०२३ रोजी झालेल्या त्यांच्या संबंधित बैठकांमध्ये लेखापरीक्षण समितीने वरील परिणामांचा आढावा घेतला आहे आणि संचालक मंडळाने वरील परिणाम मंजूर केले असून ते प्रसारित करण्यास मंजुरी दिली आहे.
२. लेखापरीक्षित स्वतंत्र वित्तीय परिणामांविषयी अधिक माहिती खालील प्रमाणे आहे:

(₹ कोटीत)

| तपशील | संपलेले वर्ष ३१ मार्च, २०२३ | संपलेले वर्ष ३१ मार्च, २०२२ |
|---|---|---|
| विक्री व सेवा मूल्य (महसूल) | ५६६,८०५ | ४६६,४२५ |
| वजा: वसूल केलेला जीएसटी | २३,५५६ | २१,०५० |
| **प्रचलनाद्वारे महसूल** | **५४३,२४९** | **४४५,३७५** |
| असाधारण मुद्दे आणि करपूर्व नफा | ५५,५७२ | ४६,७८६ |
| करपूर्व नफा | ५५,५७२ | ४६,७८६ |
| वर्षासाठी नफा | ४४,२०५ | ३९,०८४ |
| एकूण सर्वसमावेशक मिळकत (कर पश्चात) | ३६,०८१ | ३७,१०५ |

३. ३१ मार्च, २०२३ रोजी संपलेल्या वर्षाचे तपशिलवार लेखापरीक्षित स्वतंत्र आणि एकत्रित वित्तीय परिणाम सेबी (लिस्टिंग ऑब्लीगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेन्टस्) रेग्युलेशन्स, २०१५ मधील रेग्युलेशन ३३ अनुशंगाने स्टॉक एक्सचेंजकडे सादर करण्यात आले आहेत व वरील परिणाम त्यांचा संक्षिप्त गोषवारा आहेत.
३१ मार्च, २०२३ रोजी संपलेल्या वर्षाचे तपशिलवार लेखापरीक्षित स्वतंत्र आणि एकत्रित वित्तीय परिणाम स्टॉक एक्सचेंजेसच्या वेबसाईटवर **(www.bseindia.com / www.nseindia.com)** आणि कंपनीच्या वेबसाईटवर **www.ril.com** येथे उपलब्ध आहेत.

**रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड** करिता
सही/-
मुकेश डी. अंबानी
अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक

दिनांक : २१ एप्रिल, २०२३

www.ril.com

# राज्यात ९९३ नवे करोना रुग्ण; पाच जणांचा मृत्यू

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** राज्यात शुक्रवारी ९९३ करोना रुग्णांची नोंद झाली, तर पाच बाधितांचा मृत्यू झाला.

सध्या राज्यातील मृत्युदर १.८१ टक्के आहे. आजपर्यंत तपासण्यात आलेल्या ८ कोटी ६८ लाख ६९ हजार १९ प्रयोगशाळा नमुन्यांपैकी ८१ लाख ६० हजार ४९९ (०९.३९ टक्के) रुग्ण बाधित आढळले.

राज्यात आजपर्यंत एकूण ८० लाख ६ हजार ३२ करोनाबाधित रुग्ण बरे होऊन घरी गेल्याची माहिती राज्य आरोग्य विभागाने दिली आहे. यामुळे राज्यातील रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ९८.११ टक्के एवढे झाले आहे.



### ९१ बाधितांची जनुकीय क्रमनिर्धारण चाचणी ...

राज्यातील आंतरराष्ट्रीय विमानतळांवर आतापर्यंत १९ लाख २२ हजार ६१६ प्रवासी आले असून यातील ४३ हजार ४०९ प्रवाशांची ‘आरटीपीसीआर’ चाचणी करण्यात आली, तर ९१ जणांचे नमुने जनुकीय क्रमनिर्धारणसाठी पाठविण्यात आले.

### मुंबईत २२६ जणांना संसर्ग

मुंबईत शुक्रवारी २२६ रुग्ण आढळले असून आता रुग्णांची संख्या ११ लाख ६० हजार ६१६ झाली आहे, तर दिवसभरात दोघांचा मृत्यू झाला.

**Army Institute of Technology**
Dighi Hills, Pune-411015

**TENDER ENQUIRY**
Army Institute of Technology is interested in
**‘Procurement of Solidworks Education Software’.**
**Tender Fee:** Rs 200/-, **EMD :** Rs 10,000/-

**Last date of submission :** 02May 2023
Refer **www.aitpune.com** for details
e-Mail: **project@aitpune.edu.in,** Tele: 7249250184/185

**सोसायटी फॉर अप्लाइड मायक्रोवेव्ह इलेक्ट्रॉनिक्स इंजिनीयरिंग अ‍ॅण्ड रिसर्च (समीर)**
SAMEER
(इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान मंत्रालय, भारत सरकार अंतर्गत)
आयआयटी कॅम्पस, पवई, मुंबई-४०० ०७६.

**निविदा सूचना**

| अ.क्र. | वर्णन | निविदा क्रमांक | नियत तारीख |
|---|---|---|---|
| ०१ | व्हॅक-आयकॉन पम्प्स व तिच्या उपसाधकांचा पुरवठा. | एसएमआर/पीयूआर/सीएन००३/२०२४आय/पीटी | २५.०५.२०२३ |

निविदेचा तपशील खालील वेबसाइट्सवरून प्राप्त करता येईल : **http://www.sameer.gov.in** व **https://eprocure.gov.in/cppp/**
अधिक चौकशीकरिता : **purchase@sameer.gov.in**
खरेदी अधिकारी : (०२२-२५७२३०३०, २५७२७२२०/२१/२३)
सीबीसी ०६१०९/१२/०००२/२३२४

**इंजिनिअरींग प्रोजेक्ट्स (इंडिया) लि.**
**(भारत सरकारची एक उद्योग संस्था)**
एनआयटी नं. डीएलआय/सीओएन/९०५/७८५
गोंदिया, महाराष्ट्र येथे १५० विद्यार्थी संख्येचे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि ६५० खाटांचे रुग्णालय यांचे बांधकाम करणे तसेच त्यासाठी लागू असणाऱ्या एमसीआय/एनएमसी या प्रमाणकांनुसार सहाय्यकारी इमारतीची उभारणी आणि सोबतची कामे वगैरे करणे यासाठी ई-निविदा मागविण्याची ही सूचना आहे.
**अंदाजे खर्च : रु. ५५३.६० कोटी (जीएसटी शिवाय)**
**पूर्ण करण्याची मुदत :** २४ महिने + (डीएलपी) ६० महिन्यांचा
इच्छुक बोलिदारांना सल्ला देण्यात येतो की, त्यांनी अधिक तपशिलासाठी **www.engineeringprojects.com** येथे भेट द्यावी.
सीपीपी पोर्टलवर ऑनलाइन बोली सादर करण्यासाठी **https://etenders.gov.in/ eprocure/app**

**मध्य रेल्वे**
शुद्धिपत्र-११/२०२३
**निविदा सूचना क्र. ई-१३/२०२३**
**दि. २३.०३.२०२३**
कृपया **दि. ०२.०४.२०२३** रोजी प्रसिद्ध झालेली **ई-प्रॉक. टेंडर नोटीस नं. ई-१३/२०२३ दि. ३०.०३.२०२३** पाहावी. निविदा क्र. ४३२३५००३ ही **२४.०४.२०२३** रोजी नियत आहे. कृपया नोंद घ्यावी की, या निविदेच्या **टी.ओ.डी.**मध्ये **०८.०५.२०२३** अशी सुधारणा करण्यात आलेली आहे. त्याचा तपशील **www.ireps.gov.in** या वेबसाइटवर पाहता येईल.
**प्रिन्सिपल चीफ मटेरियल्स मॅनेजर/सीएसएमटी**
रेल्वेमदत हेल्पलाइन १३९

